The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत मुक्ताबाई - समाजप्रबोधन करण्या-या अद्य स्त्रीवादी महिला.

**संशोधक - सुचिता सुभाषराव ढोणे**

**प्रस्तावना**

संत साहित्य त्यातील अभंग म्हणजे मानवी जीवनाला लाभलेले सर्वश्रेष्ठ ज्ञान होय. संत साहित्य अभंग हे मानवी जीवनात अमृताची जागा घेतात संतांमध्ये तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत एकनाथ महाराज यांच्या व्यतिरिक्त अनेक महिला संत आहेत त्यामध्ये संत जनाबाई, संत मीराबाई, संत बहिणाबाई आणि संत मुक्ताबाई अशा अनेक महान संत स्त्रिया आहेत. ज्यांनी आपल्या अभंगातून अगदी सहजरित्या कोणालाही न दुखवता समाजातील सर्व मानवी प्राणीमात्रांची कान उघडणी केली आहे. स्त्री स्वातंत्र्य व स्त्री पुरुष असमानता यांचा अभ्यास करताना असे अनेक पुरावे मिळतात. ज्यामध्ये आम्हाला देवत्वाच्या काळापासून स्त्रियांची ताकद कळते. स्त्री कधीच कमी नव्हती. काळाच्या ओघात स्त्रीने बंधने स्वीकारून आपले अस्तित्व कमी केले.

संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडात सर्वात धाकटी बहीण म्हणजे संत मुक्ताबाई होय. विठ्ठलपंत आणि रुक्मिणी या दांपत्याच्या पोटी जन्मलेल्या या भावंडापैकी निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर व सोपानदेव यांच्यानंतर सर्वात शेवटी मुक्ताबाईचा जन्म झालेला आहे. या कुटुंबातील ती एकमेव कन्यारत्न असल्यामुळे साहजिकच लाडकी असणार. त्यात तिचे व्यक्तिमत्त्व मुळातच लडिवाळ असल्यामुळे ती सर्वांनाच प्रिय होती. आई-वडिलांचे संस्कार व ज्ञानदेवादी भावंडापाशी असलेले ज्ञानभांडार तिला सहजपणे प्राप्त झाले. अल्प आयुष्य लाभले असले तरी तिच्या अंगी मूलतःच लवकर प्रौढत्व आले.

**उद्देश-**

1. संत मुक्ताबाईंच्या समाज प्रबोधन परविचारांची ओळख करून देणे.
2. संत मुक्ताबाईंच्या स्त्री पुरुष समानतेच्या विचारांचा आढावा घेणे.
3. संत मुक्ताबाईंच्या विचारांची अभंगाची ओळख करून देणे त्यामधील सार जाणून घेणे.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी तथ्य संकलनाच्या दुय्यम सामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे, मासिके अधिकचा आधार घेण्यात आलेला आहे. तसेच विश्लेषणात्मक व वर्णनात्मक अध्ययन पद्धतीचा आधार सदर संशोधन निबंधासाठी घेण्यात आलेला आहे.

संत मुक्ताबाईचे अभंग म्हणजे आयुष्यात कसे जीवन विधीत करावे याचे उत्तम उदाहरण होय. त्यांनी त्यांच्या अभंगातून अनेक संदेश जगातील सर्व मानव प्राणीमात्रांसाठी दिलेले आहेत, त्याबद्दल पुढे सांगितलेले आहे.

संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर व संत सोपान देव हे मुक्ताबाईचे छोटे भावंड या कुटुंबाचा तत्कालीन समाजातील धर्माचे खोटे पुजारी यांच्याकडून छळ झाला होता. त्यामुळे बालपणापासून

मुक्ताबाईंना गरिबी आणि समाजाकडून मिळालेल्या तुच्छ वागणुकीचा अनुभव आलेला होता. आईच्या संस्कृत व त्यांनाचा आणि वडिलांच्या विद्वितीचा उपजत वारसा मुक्त बाईला इतर भावंडा प्रमाणे पुरेपूर मिळालेला होता. त्याबद्दल पुढे सांगितलेले आहे.

"मुंगी उडाली आकाशी । तिने गिळिले सूर्यासी
थोर नवलाव झाला । वांझे पुत्र प्रसवला
विंचू पाताळासी जाय । शेष माथा वंदी पाय
माशी व्याली घार झाली । देखोनी मुक्ताई हासली."

संत मुक्ताबाईचा या अभंगातून जे असंभवनीय ते संभवनीय झाले. अशक्य गोष्ट शक्य झालेली आहे, हे गुढ सांगत आहे. अशा आश्चर्य चकित करणाऱ्या घटना घडल्यामुळे त्यांना स्वतःला हसू येत आहे 'देखोनी मुक्ताई हासली' अशक्य कोटीतलं घडलंय जे विनोदी आहे, ते पाहून त्यांना हसू येतंय या रचनेचे अनेक अर्थ लावले जाऊ शकतील.

मुंगी उडाली आकाशी तिने गिळिले सुर्याशी- या ओळीत असे सांगायचे आहे, की मुंगी हा तसा सामान्य येवलासा प्राणी परंतु तिची चिकाटी व शिस्त असामान्य असते हे दोन्ही गुण आपल्या मानवप्राण्यामध्ये बुद्धी, हात, पाय, असून देखील नसतात. असे संत मुक्ताईला म्हणायचे आहे मुंगी आपल्या शिस्त चिकाटी या गुणामुळे कोणतेही काम पूर्ण करू शकते याचा बोध वरील ओळी तुन होतो.

थोर नवलाव झाला वांझे पुत्र प्रसावला- वांझ स्त्रीला पुत्र झाला जे शक्य नाही परंतु तिला पुत्र नसला तरी ती सर्वांवर आईप्रमाणे प्रेम करते आणि आईप्रमाणे प्रेम सर्वांवर फक्त आणि फक्त स्त्रिया करू शकतात इतर कोणताही मानव प्राणी व प्राणी असे करू शकत नाही.

विंचू पातळाशी जाय शेष माथा वंदी पाय - विंचू पातळावर गेल्यावर शेष नागावर जाऊन उभा राहिला. वरील ओळीत मुक्ताबाईना असे म्हणायचे आहे की, तुम्ही एवढे ज्ञानी व्हा कोणत्याही क्षेत्रात जा तिथे तुमचे ज्ञान अथांग असावे. त्याद्वारे तुम्ही कोणत्याही क्षेत्रात सर्वोच्च स्थानी असावे.

माशी व्याली घार झाली देखुनी मुक्ताई हसली - मासा हा प्राणी पाण्यात राहणारा परंतु त्याने पाण्याच्या वर डोके काढून घारीस पाहीतले आणि त्याप्रमाणे वर्तन केले. जर आपण एका क्षेत्रात काम करत असलो तरी अनेक क्षेत्राचे ज्ञान ठेवावी लागेल ज्ञानाच्या कक्षा रुंदवाव्यात असे मुक्ताईला म्हणायचे आहे तेव्हा आपण अशक्य गोष्ट साध्य करू शकतो.

मुंगीने आकाशात उड्डाण केले आणि सूर्याला गिळले. वांझ स्त्रीला मुलगा झाला. या मुक्ताबाईंच्या श्लोकातील ओळी आहेत. या ओळी स्वतःच विद्यमान स्थितीच्या विरूद्ध अवहेलनाची भावना देतात. हीच अवहेलना मुक्ताबाई आणि भक्ती चळवळीतील इतर स्त्रियांना वेगळे करते. भक्ती चळवळ ही भारतातील पहिल्या आंतरखंडीय चळवळींपैकी एक आहे. प्रथमतः, देवाची उपासना करणे, वैयक्तिक भक्तीद्वारे आणि ब्राह्मणवादी अधिका-यांनी विकसित केलेल्या विस्तृत विधी आणि चालीरीतींद्वारे ईथरीयलची प्रशंसा करणे हे मुख्यतः त्याचे उद्दिष्ट होते. दुसरे म्हणजे, ही प्रक्रिया महिलांसाठी आणि समाजातील उपेक्षित वर्गातील लोकांसाठी खुली करण्याच्या दृष्टीने अधिक

समावेशक बनविण्यावर लक्ष केंद्रित केले आहे ज्यांना वगळण्यात आले आहे. अशा प्रकारे, ही चळवळ लिंग, वर्ग आणि जातीच्या श्रेणींमध्ये अधिक समावेशक बनवण्यासाठी अध्यात्मवादाच्या सीमा ओलांडली. अशाच एका संताने या चळवळीचा घोषवाक्य केले ते म्हणजे मुक्ताबाई किंवा मुक्ताई.

मुक्ताबाई सहजपणे मागे बसू शकल्या असत्या आणि आपल्या भावांना त्यांच्या आध्यात्मिक प्रयत्नांमध्ये पाठिंबा देऊ शकल्या असत्या, परंतु तिने तिथेच थांबायचे नाही. तिने भक्तीचा मार्ग शोधण्याचा आणि समाजाने तिच्यापासून बचाव केला असे काहीतरी करण्याचे निवडले. इथेच तिच्यात स्त्रीवादाची मुळे अंकुरलेली दिसतात. मराठीत मुक्ता म्हणजे स्वातंत्र्य हेच मुक्ताबाई आजच्या पिढीतील स्त्रियांसाठी सजवून सुचित करते मुक्तीची भावना सर्वसाधारणपणे लोकांसाठी ती कठोर ब्राह्मणवादी आणि सामाजिक रुढी अनिष्ट प्रथा आणि परंपरा यांना दूर सारते. मुक्ताई स्त्री असून सुद्धा तिने अनेक प्रसंगी तिच्या भावांना साथ दिली ठामपणे उभी राहिली याचे सर्वात प्रसिद्ध उदाहरण अभंग तात्याचे दार उघडा ज्ञानदेवा यावरून कळते या अभंगात मुक्ताबाईंनी संत ज्ञानदेवास म्हणतात कोणाच्याही अपमानास्पद शब्द ऐकून रागाने खोलीत कोंढून घेऊ नये संत असल्याने जगाच्या भानगडीत पडू नये खऱ्या परिस्थितीला तोंड देण्याचा प्रयत्न करायला हवा. मुक्ताबाईंच्या प्रतिमेत आणि त्यांनी केलेल्या कार्यात भक्ती, धैर्य आणि स्वतंत्र आत्मा आहे. तिच्यासारख्या भक्ती संतांनी त्यांच्या भूमिकांवर मात केली जी त्याकाळी मातृत्व आणि कौटुंबिक नातेसंबंधांचे पालनपोषण यापुरती मर्यादित होती आणि ज्या क्षेत्रात महिलांना नेहमीच दूर ठेवले जात होते त्या क्षेत्रात समानतेसाठी मोहीम राबवली.

**स्त्री - पुरुष समान आहेत हे पटवून देताना मुक्ताबाई खरी - स्त्रीवादाची प्रवृत्तक दिसते**

मुक्ताई स्त्री असून सुद्धा तिने अनेक प्रसंगी तिच्या भावांना साथ दिली ठामपणे उभी राहिली याचे सर्वात प्रसिद्ध उदाहरण अभंग तात्याचे दार उघडा ज्ञानदेवा यावरून कळते या अभंगात मुक्ताबाईंनी संत ज्ञानदेवास म्हणतात कोणाच्याही अपमानास्पद शब्द ऐकून रागाने खोलीत कोंढून घेऊ नये संत असल्याने जगाच्या भानगडीत पडू नये खऱ्या परिस्थितीला तोंड द्यावे. चांगदेव हा शक्तिशाली संत होते जे निसर्ग आणि वाघावर नियंत्रण ठेवण्याच्या क्षमतेसाठी प्रसिद्ध होते. चांगदेव स्त्री पुरुष विषयी वेगळे विचार करायचे परंतु एका प्रसंगातून मुक्ताबाईने त्यांचे डोळे उघडले. संतांमध्ये लैंगिकता आणि लज्जा यांच्या जडणघडण नसाव्या त्यांच्यासाठी प्रत्येक प्राणी समान असावा. त्यांनी प्रत्येक प्राणी मात्रामध्ये ईश्वराचे रूप पाहितले पाहिजे.

मुक्ताबाई पुढील अभंगातून सर्वांना आदर दिला जावा असे सांगितले आहे पुढील अभंग सांगण्याचा प्रसंग असा होता की एकदा नामदेवाच्या कीर्तनात सर्व संत हजर असताना निवृत्तीनाथ संत ज्ञानदेव सर्व त्यांना नमस्कार करतात परंतु नामदेव प्रति नमस्कार करत नाही भावंडाचे आगमनावर मुक्ताई सर्व संतांमध्ये लहान असून सुद्धा नमस्कार करत नाही इतरांच्या सांगण्यावरून हे उलट ती पुढील अभंग म्हणते

अखंड जयाला देवाचा शेजार । कारे अहंकार नाही गेला ।।
मान अपमान वाढविसी हेवा । दिवस असता दिवा हाती घेसी ।

परब्रह्मासंगे नित्य तुझा खेळ । आंधळ्याचे डोहाळे का बा झाले ।
कल्पतरू तळवटी इच्छिती ते गोष्टी । अद्यापि नरोटी राहिली का ।
घरी कामधेनु ताक मागू जाय । ऐसा द्वाड आहे जगा माजी ।
म्हणे मुक्ताबाई जाई ना दर्शना । आधी अभिमाना दूर करा।।

वरील अभंग म्हणून नामदेवास त्यांची चूक लक्षात आणून दिली. जो नेहमी देवाच्या सानिध्यात राहतो तो अहंकाराच्या बळी जात नाही आणि मान अभिमान एकमेकांना हेवेदावे वाढवतो म्हणून दिवा हातीघेतला तरी हा भाव का.

मुक्ताबाईच्या आयुष्यातील या चार प्रमुख घटनांकडे पाहिल्यास काही बावी प्रकवनि जाणवतात.

प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था तसेच जवळपास सर्वच पंच व संप्रदायात गुरु-शिष्य नात्याला महत्वाचे स्थान आहे. व्यक्ती कितीही ज्ञानी असली, मात्र तिला गुरुउपदेश झालेला नसेल.तर त्यात काही कमतरता आहे असे समजले जाते. चांगदेवासंदर्भातील घटना पाहिल्यास त्यांनी मुक्ताईचे शिष्यत्व पात्करले. एवढेच नव्हे तर हे नाते माय लेकरू या आपुच्च पातळीवर नेले. वरवर पाहता हे फार विशेष वाटत नसले तरी तेराव्या शतकात संतपरंपरेत मुक्ताबाई ही एकमेव स्थी गुरू म्हणून होऊन गेली हे येथे महत्वाचे आहे. याशिवाय शिष्य चांगदेव चौदाशे वर्षे वयाचे तर गुरू मुक्ताबाई अवघ्या बारा तेरा वर्षे वयाची, याकडे पाहणेही आवश्यक आहे.

ज्ञानदेव ज्यावेळी झोपडीचे दार बंद करून जगापासून स्वतः दूर राहण्याचा निर्णय घेतात त्यावेळी निवृत्ती व सोपानाने विनवणी केल्यावर ते बाहेर येत नाहीत. मात्र मुक्ताबाई आपल्या बुध्दीच्या बळावर व अतिशय कौशल्याने त्यांचे मन वळवते. या निमित्ताने संतांची लक्षणे, या भूतलावर येण्याचे त्यांचे प्रयोजन आणि योनी कसा असावा याचे तातियक विवेचन ताटीच्या अभंगात आले आहे. ते पाहिल्यावर तत्पचिंतक कवी ज्ञानदेवांच्या मनावर झाकोळलेले मळभ दूर सासन त्यांना पुन्हा जागृत करण्याचे सामर्थ्य या चिमुरडीचा आध्यात्मिक अधिकार किती मोठा असावा याची कल्पना येऊ शकते.

विसोवा चाटी यांना ज्ञानदेवांनी जठराग्नी प्रदिप्त केलेला व त्यांच्या परळीविना पाठीवर मांडे भाजणारी मुक्ताई हे दृश्य पहावयास मिळाले. ते पाहून आश्चर्यचकित झालेल्या विसोवाला मुक्ताईला परत मिळू न देणे व नंतर जे मिळाले ते फोडून टाकणे या आपल्या कृत्याचा पश्वात्ताप झाला. त्याने तिचे शिष्यत्व पत्करले. हे पाहिल्यावर विसोबाची आळंदीतील प्रतिष्ठा, त्याचे वय व विद्वता आणि संन्याश्याची पोर असलेली, चिमुकली व अल्पशिक्षित मुक्ताबाई यांची तुलना करून हा विरोधाभास असूनही तिथे मोठेपण नेमके कशात आहे यावर विचार करावा लागतो.

संत नामदेव हे तर तेराव्या शतकातील वारकरी संप्रदायातील अतिशय अधिकारी पुरुष होते. प्रापक्ष पांडुरंग त्यांच्याशी बोलतो अशी तेव्हा समजूत होती. त्यामुळेच त्यांना अहंकार झाला होता. आपण जेष्ठ व श्रेष्ठ आहोत या अहंकारामुळे ते कुणालाही मान देत नाहीत, त्यामुळे त्यांचे आध्यामिकदृष्या अध:पतन होत आहे ही बाब मुक्ताईच्या ध्यानात येते. म्हणूनच ती गोरोबा कुंभार या वयोवृब्द संतांमार्फत नामदेवाचा अहंकार दूर करण्याचे काम करते.

वरील चार घटना या मुक्ताईच्या आयुष्यात फार महत्वाच्या आहेत. भक्तियोगाचे अधिकारी नामदेव, ज्ञानयोगी ज्ञानेश्वर, हटयोगी चांगदेव आणि कर्मयोगी विसोवा या चार वेगवेगळ्या क्षेत्रातील अधिकारी पुरुषांना प्रसंगानुरूप योग्य मार्गावर आणण्याचे काम ती करते. या विविध प्रसंगात तिला आलेले अकाली प्रौढत्व जसे पहावयास मिळते तसेच तिच्या अंगी असलेले स्थितप्रज्ञता, बंडखोरपणा, स्पष्टवक्तेपणा, भावविवशता आणि स्वीसुलभ प्रेमळपणा, जिलाळा, वास्तत्य, मार्दव असे विविध गुण आढळतात. ही उदाहरणे पाहिल्यास ती फक्त वयाने लहान होती, मात्र तिचा यौगिक व आध्यात्मिक क्षेत्रातील अधिकार मोठा होता हे लक्षात आल्याशिवाय राहत नाही. स्वतः मुक्ताई आपल्या अभंगांतून गुरू निवृत्तीनाथांचा अनेकदा आदपूर्वक गौरव करते, ज्ञानदेवांसाठी 'ताटीचे अभंग' रचते, सोपानदेवांचीही प्रसंगानुरुप आठवण काढते. असे असूनही तिच्यावर जिवापाड प्रेम करणारी ही भावंडे तिचा उल्लेख आपल्या अभंगरचनेत का करीत नाहीत? या मागे काय कारण असावे? किंवा तिचा उल्लेख असलेले काही अभंग असतील मात्र ते कालौघात नष्ट झाल्यामुळे उपलब्ध नसावेत का? असे प्रश्न पडतात. या लेखांमधून मुक्ताबाईची प्रगल्भ बुद्धिमत्ता आपल्याला दिसून येते. त्यांनीसमाज प्रबोधन अनेक अभंगातून केलेले आहे. त्याचप्रमाणे स्त्री पुरुष समानता रुजवणारी प्रथम महिला संत त्या आहेत. म्हणून स्त्रीवादाच्या त्या आद्य प्रवर्तक आहेत. त्याचप्रमाणे लहान-मोठा किंवा कोणताही प्राणीमात्रामध्ये भेद केला जाऊ नये असा मोठा संदेश तिने तिच्या वेगवेगळ्या अभंगातून सर्वांना दिलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

1. संगवई विजया, 'मुक्ताईचे योग-दर्शन', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे
2. चिटणीस कृ.ना., 'समाज व संस्कृती', (प्रका.) चिटणीस रा. कृ., पुणे, १९८७,
3. रेळेकर नि. ना., 'श्री नामदेव चरित्र, काव्य आणि कार्य', शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, १९७०,
4. काळे कल्याण, (लेख) 'वारकरी संप्रदायाची शक्ती', 'वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य', (संपा.) मोहिते शिवाजीराव, कर्मवीर प्रकाशन, पुणे,
5. दांडेकर शं. वा. (संपा.), 'वारकरी पंथाचा इतिहास', वारकरी प्रकाशन मंडळ, नागपूर,
6. संगवई विजया, 'मुक्ताईचे योग-दर्शन', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे
7. ढेरे रा. चिं, 'लीळाचरित्रातील सिद्ध आणि नाथ', (लेख), 'संस्कृति-सुगंध', (संपा.) वेंकटेशशास्त्री जोशी व इतर, (प्रका.) दास्ताने रामचंद्र आणि कं., पुणे,